महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


क्रमांक : १४४२/गट-क संयुक्त-दु.नि/२०२१/२४ दिनांक:- १८ नोव्हेंबर , २०२२

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र गट- क सेवा (मुख्य) परीक्षा २०२१-दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क सर्वसाधारण गुणवत्ता यादी,तात्पुरती निवड यादी व भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out)सुविधेबाबत**

**संदर्भ :- १) जाहिरात क्रमांक ५९/२०२२**

महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा २०२१ मधील दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क या संवर्गाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी व तात्पूर्ती निवड यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या असून त्या आधारे उमेदवारांकडून भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प मागविण्यात येत आहे.

**२.** सदर तात्पुरती निवड यादी व सर्वसाधारण गुणवत्ता यादी या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या असून उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी पडताळणीअंती काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये/ शिफारशीमध्ये बदल होऊ शकतो.

**३.** खेळाडू प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची क्रीडाविषयक कागदपत्रे प्राधिकृत क्रीडा अधिका-यांनी तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून त्यांचा खेळाडू प्रवर्गाचा दावा तात्पुरता ग्राह्य धरण्यात आला आहे व त्यांचा तात्पुरत्या सर्वसाधारण गुणवत्ता यादी व निवड यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

**४.** प्रस्तुत तात्पुरती निवड यादी मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.

**५.** प्रस्तुत परीक्षेच्या भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Post Preference / Opting Out' वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२ रोजी १२.०० वाजेपासून दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

**६.** ऑनलाईन पध्दतीखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय ग्राहय धरला जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांची कोणतीही बाब / निवेदने / पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतली जाणार नाहीत.

**७.** भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) विकल्पाआधारे अंतिम निकाल / शिफारशीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. तसेच भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणा-या उमेदवारांचा अंतिम निकाल प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

**८.** भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्यास कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)

ठिकाण – मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई